**संपादकीय:**

# वस्तू व सेवेवरील कर (जी.एस.टी)-शंका दूर करण्याची गरज

एप्रिल २००५ पासून आपल्या देशात मूल्यवर्धित कर (व्हॅट) अंमलात आला. आता दि. १ एप्रिल २०१० पासून गुडस् ॲण्ड सर्व्हिस टॅक्स (जी.एस.टी) म्हणजेच वस्तू व सेवेवरील कर संपूर्ण देशभर लागू होणार आहे. या कराच्या अंमलबजावणीमुळे सध्या आस्तित्वात असलेल्या असंख्य करांऐवजी संपूर्ण देशभर हा एकच कर, समान दराने लागू होईल. यामुळे असंख्य प्रकारच्या करांचा भरणा करण्यात करदात्यांचा जो वेळ जातो आणि जो त्रास सहन करावा लागतो त्यातून त्याची सुटका होईल, असे वाटते. या कराची योग्य पध्दतीने अंमलबजावणी होऊन संपूर्ण देशभरात एकाच दराने कराची वसूली सुरु झाली आणि इतर सर्व कर रद्द झाले तर व्यापारी उद्योजकांना व्यापाराकडे अधिक लक्ष देता येईल. करप्रणालीमध्ये सुसुत्रता येऊन आर्थिक विकासाला चालना मिळेल. आज जगामधल्या सुमारे १३० देशांनी अप्रत्यक्ष कर रचनेमधील या वस्तू व सेवेवरील कराची पध्दती स्वीकारलेली आहे. आपल्या देशातही मूल्यवर्धित कराच्या (व्हॅट) मुळ तत्वांवर आधारीत ही कर प्रणाली लवकरच लागू होणार आहे. म्हणूनच याबाबत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. सरकारने अंमलबजावणीची तारीख तर जाहीर केली आहे मात्र, या कराचे स्वरूप कसे असेल याबाबत अद्यापपर्यंत खुलासा झालेला नाही. कराचा दर काय असेल, दि. ३१ मार्च २००९ रोजी शिल्लक असलेल्या मालावर (स्टॉक) परतावा (रिफंड) मिळेल की नाही, ज्या वस्तूंवर सध्या ४% व्हॅट आहे त्या वस्तूंवर (जी.एस.टी) कराचा दर काय असेल? व्हॅटप्रमाणे या करातही विसंगती तर असणार नाहीत ना? हा कर, कर प्रणालीतील सुधारणा ठरणार की महसूल वाढीचा उपाय ठरणार इत्यादी. अशी अनेक प्रश्ने अद्याप अनुत्तरीत आहेत. अंमलबजावणीची तारीख जवळ येत असली तरी याबाबत स्पष्टपणे माहिती शासकिय अधिकारी, कर सल्लागार कोणीही देऊ शकत नाही. ही कर प्रणाली निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. मात्र, आतापर्यंतचा अनुभव असा आहे की, कोणताही नवा कर लागू करताना त्यात असंख्य त्रुटी, उणिवा ठेवल्या जातात. ज्यामुळे व्यापाऱ्यांना नाहक त्रास, भुर्दंड सहन करावा लागतो. व्यापारी हा केवळ करदाता नसून सरकार करीता तो कराच्या रूपाने महसूल गोळा करून भरणा करतो. हे करत असताना ह्या करांचा हिशोब ठेवण्याकरीता जो प्रशासकीय खर्च